# निशाण क्र. २४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दुरूस्तीस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा दावा प्रतिवादींविरूध्द् हक्क स्थापनेसाठी दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे समन्स त्यांचे आडनाव 'लाड' असल्याने न बजावता परत आले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना लाडगावकर व लाड या नावानेही ओळखतात. त्यामुळे प्रतिवादींची आडनावे लाडगावकर अशी दाव्यात नमूद केलेली होती. त्यांनी समन्स न स्विकारल्याने दाव्यात प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या आडनावामध्ये दुरूस्ती करणे आवश्यक झाले आहे. सबब, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या लाडगावकर या आडनावा पुढे 'उर्फ लाड' असे लिहिण्यास व त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी प्रस्तुत वादींनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून योग्य तो आदेश पारित करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. प्रस्तुत प्रतिवादी यांचे आडनाव लाड आहे याबाबत वाद दिसून येत नाही. सदरची दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची दुरूस्ती आहे असे मला वाटते. प्रकरणामधील गुंतागुंत टाळणेसाठी सदर दुरूस्तीस करणे आवश्यक वाटते. प्रस्तुत कामी मुद्दे निश्चित करण्यात आले नाहीत. तसेच पुराव्याचे कामकाज अद्याप चालू झाले नाही. प्रस्तुत दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार नाही असे मला वाटते. या दुरूस्तीमुळे प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. या सर्व कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज

मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरूस्ती करून दावा दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—

देवगड ( गि.सु.माने )
दिनांक १७/०३/२०१८ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.